# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक:—

क्र.वि.नि.वि./३००/ ६/२०१५
मुंबई — ४०० ०३२,
२५ ऑगस्ट, २०१५.

प्रति,

विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक व विभागप्रमुख.

विषय : —विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१४—२०१५) प्रदान करणेबाबत.

संदर्भ :— क्र.वि.नि.वि./३००/२/२०१५ दि. ४ जुलै २०१५

महोदय/महोदया,

आपणास विनंती करण्यात येते की, "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराकरिता" सादर कररण्याची अंतीम मुदत **दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे**.

सहज संदर्भाकरिता "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार सन २०१४—२०१५" परिपत्रक क्र. ३००/२/२०१५, दिनांक ४ जुलै २०१५ पहावे. परिपत्रकात नमुद केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करून प्रस्ताव **३१ ऑगस्ट २०१५ पर्यत सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, कक्ष क्र. १३२, पहिला मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२ येथे पाठवावे**. त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच अपु—या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

कृपया आपण हे परिपत्रक सर्व संबधित विद्यापीठ शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे. याबाबत सविस्तर माहिती तसेच 'अ' 'ब' आणि 'क' विवरण पत्र विद्यापीठ संकेतस्थळ www.mu.ac.in वर उपलब्ध आहे.

25/8/15

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)

**स्थळ :— मुंबई — ४०० ०३२**
दिनांक :— २५ ऑगस्ट २०१५

---

**पुरस्काराकरीता प्राथमिक अटी :—** खालील अटी पूर्ण करणारे शिक्षिका "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराकरिता" अर्ज करण्यास/प्रस्ताव पाठविण्यास पात्र राहतील.

१. शासनाने विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्त झालेले शिक्षिक तसेच विद्यापीठाची मान्यता प्रत जोडणे आवश्यक राहिल.
२ शिक्षिकांनी नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले/प्रतिनियुक्तीवर आहेत अशा शिक्षिका पुरस्कारासाठी अपात्र राहतील.
३ शिक्षकांनी कमीत कमी १५ वर्षांची अध्यापन सेवा केलेली असावी, याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य देतील.
४ "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्राप्त शिक्षिका, पुनःश्च अशा पुरस्काराठी पात्र राहणार नाहीत.
५ शिक्षकाविरूध्द फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा. तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षिका देतील.
६ शिक्षक खाजगी शिकवणी करीत नसावा, तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षिका देतील.
७ संबंधित महाविद्यालयांचे मुल्यांकन (Re-Accreditation) अनिवार्य राहील.
८ **मुंबई विद्यापीठ विभागाचे संचालक/विभागप्रमुख यांनी आपले प्रस्ताव मा. कुलसचिव यांच्या शिफारशीसह सादर करण्यात यावे व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी आपले प्रस्ताव अ.ध्यक्ष/सेक्रेटरी यांच्यामार्फत पाठविण्यात यावेत, अन्यथा या विभागास प्राप्त झालेले प्रस्ताव निवड समितीपुढे सादर केले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.**

........

प्रपत्र 'अ'

सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१४–२०१५)

| | | |
|---|---|---|
| १) | शिक्षिकेच सपूर्ण नाव | : |
| २) | पत्ता व दूरध्वनी क्रमांक (निवास) | : |
| ३) | सेवेत असलेल्या महाविद्यालयाचे / विद्यापीठ विभागाचे नाव व पत्ता | : |
| ४) | धारण केलेले पद (स्थायी) | : |
| ५) | अध्यापनाचा अनुभव | : |
| ६) | शैक्षणिक अर्हता | : |
| ७) | प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकाचे सपूर्ण नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : |
| ८) | सूचकाचे महाविद्यालय / विद्यापीठ नाव व पत्ता व मोहर | : |
| | प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी | |
| ९) | प्रस्तावास अनुमोदन देणा–या शिक्षकाचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक | : |
| १०) | अनुमोदकाचे महाविद्यालय / विद्यापीठ विभागाचे नाव, पत्ता व मोहर | : |
| | प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी | |

मी खाली सही करणार श्रीमती / कुमारी ————————————————————————

असे जाहीर करते की उपरोक्त माहिती सत्य असून सदर प्रस्तावास माझी संमती आहे.

दिनांक :

शिक्षिकेंची स्वाक्षरी

श्रीमती / कुमारी ..................................हया आमच्या विभागात ..................................
या पदावर कार्यरत असून मी प्रमाणित करतो / करते की त्यांनी वर दिलेली माहिती सत्य असून सदर प्रस्तावासाठी त्यांच्या नावाची शिफारस करीत आहे.

स्वाक्षरी

विभागाचे संचालक / विभाग प्रमुख
महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी / शिक्का

प्रपत्र — 'ब'

सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१४–२०१५) गुणतक्ता

| क्र. | पी.एच.डी. किंवा नेट सेट उत्तीर्ण झालेले असल्यास | ग्रंथ/लेखन इत्यादी (स्त्रियांच्या प्रश्नावरील संशोधन) प्रति सादर कराव्यात | सहशैक्षणिक उपक्रमातील सह सहभाग स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केलेले उल्लेखनीय कार्य (अंगणवाडी) जातियता निर्मुलन साक्षरता अभियान इत्यादी बाबत सहभाग प्रति सादर कराव्यात | सामाजिक उपक्रमामधील सहभाग (स्त्रीशोषणाविरूध्द जाणीव आणि जागृती, स्त्रीयांवरील अत्याचार, हुंडा निर्मुलन इत्यादी बाबत क्रियाशिल सहभाग) | मान्यताप्राप्त संस्थेकडून मिळालेली पारितोषिके/ बक्षिसे | थोडक्यात परिचय स्वतंत्र परिशिष्ट जोडावे (प्राचार्यांनी प्रमाणित केलेले असावे) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

दिनांक :

ठिकाण :

विद्यापीठाच्या विभागाचे संचालक/विभागप्रमुख/महाविद्यालयाचे
प्राचार्य यांची स्वाक्षरी व मोहेर/शिक्का

## प्रपत्र 'क'

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

श्रीमती/कुमारी ........................................................................................

(आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)

पदनाम — प्राध्यापक/ अधिव्याख्याता/प्रपाठक ..........................................

यांचा गतोतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र्य निर्दोष आहे.

त्यांच्या विरूध्द विभागीय अथवा अन्य प्रकारची कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू नाही.

ठिकाण :—

दिनांक :—

स्वाक्षरी

विभागाचे संचालक/विभाग प्रमुख

महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी/शिक्का